1239

जा. क्र प्रानासंकेंद्र/आस्था/ /२०१८
प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र, भाटये
दिनांक :— 12 SEP 2018

## निविदा सूचना

विषय :— प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र, भाटये, ता. जि. रत्नागिरी या कार्यालयामध्ये एकत्रित वेतनावर कंत्राटी पध्दतीने पदे भरणे बाबत...

संदर्भ : विद्यापीठ पत्र क्र. जा.क्र.डॉ.बासाकोकृवि/आस्था/ब—४/४८९७/२०१८, दि. २८.६.१८.

उपरोक्त संदर्भाधीन विषयान्वये या कार्यालयाला खालील नमुद पदे एकत्रित वेतनावर सहामाही तत्वावर ( दि. ०१/१०/२०१८ ते दि. ३१/०३/२०१८) भरण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविण्यांत येत आहेत. कंत्राटी एकत्रित वेतनावरील पदाचे नांव, कामाचे स्वरूप/तपशिल आणि शैक्षणिक अर्हतेचा तपशिल पुढील प्रमाणे.

| अ. क्र. | पदाचे नांव | कामाचे स्वरूप / तपशिल | शैक्षणिक अर्हता | पदाची संख्या |
|---|---|---|---|---|
| ०१) | कृषि सहाय्यक | कार्यालय — प्रक्षेत्रावरील उत्पादनांची विक्रीची नोंद संबंधित नोंदवहयांमध्ये घेणे, प्रक्षेत्रावरील संशोधन कामासंबंधी मदत करणे, प्रायोगिक प्लॉटमधील प्रायोगिक सर्व कामे पूर्ण करून घेणे, रोपवाटीका देखभाल व त्याच्या निरीक्षणे/नोंदी संबंधित नोंदवहयांमध्ये घेणे. | कृषि/उद्यानविद्या/वनशास्त्र/पशुविज्ञानशास्त्र/कृषि तंत्रज्ञान/कृषि अभियांत्रिकी/गृहविज्ञान/मत्स्यविज्ञान/जैवतंत्रज्ञान या विषयातून पदवी परिक्षा उत्तीर्ण<br>किंवा<br>शासनमान्य संस्था किंवा कृषि विद्यापीठामधील पदविका किंवा तिच्याशी समतुल्य म्हणून मान्यता मिळालेली अशी इतर कोणतीही अर्हता.<br>( विद्यापीठ प्रक्षेत्रावरील कामाच्या अनुभवास प्राधान्य देण्यात येईल.) | १ |
| ०२) | वाहन चालक (जीप) आणि ट्रॅक्टर चालक | प्रक्षेत्रावरील प्लॉटमधील नांगरणी, तवा, स्लॅशर मारणे, हायड्रोलिक चालविणे, चॉपर मशिन चालवणे तसेच प्रक्षेत्रावरील बाग तपासणी व पाडप केलेले नारळ ट्रॅक्टरच्या सहाय्याने वाहतुक करणे, प्रक्षेत्रावरील झावळा, फोकटे इ. कचरा वाहतुक करणे, प्रक्षेत्रावरील तसेच शेतक—यांच्या प्रक्षेत्राला भेटी देणे प्रशिक्षण कार्यक्रम, विद्यापीठ येथे जाणे इ. तसेच महत्वाच्या कामकाजासाठी जाणे | किमान ८ वी पास, ट्रॅक्टर व तत्सम जड वाहन चालविण्याचा अनुभव आणि जडवाहन चालविण्याचा सक्षम अधिका—याने दिलेला परवाना<br>( विद्यापीठ प्रक्षेत्रावरील कामाच्या अनुभवास प्राधान्य देण्यात येईल.) | २ |

वर तपशिलात नमूद केल्याप्रमाणे कंत्राटी पध्दतीने सहामाही पदासाठी एकत्रित प्रतिमहा वेतनाचा दर नमुद करून सदरचे दरपत्रक दिनांक २६/०९/२०१८ रोजी सायंकाळी १६.०० वाजेपर्यंत पोहोचतील या बेताने या कार्यालयात पोस्टाने किंवा हातबटवडा द्वारे स्विकारल्या जातील.

कामाच्या अधिक माहितीसाठी आणि अटीसंबंधी कार्यालयात कामाचे दिवशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

**अटी व शर्ती :—**

१. कार्यालयाच्या कामकाजाची वेळ सकाळी ७.४५ ते दुपारी १२.०० वा. आणि दुपारी १.४५ ते सायंकाळी ५.१५ वाजता अशी असेल. तथापि एखादया दिवसाचे काम वाढल्यास काम पूर्ण होई पर्यंत थांबावे लागेल किंवा कामपूर्ण करण्यासाठी लवकर यावे लागेल.

२. साप्ताहिक व इतर सार्वजनिक सुटया अनुज्ञेय राहतील.

३. साप्ताहिक व इतर सार्वजकि सुटया अनुज्ञेय असतील मात्र साप्ताहिक रविवार सुटट्रीच्या दिवशी कामाच्या निकडीनुसार बोलविल्यास यावे लागेल.

४. जादा केलेल्या कामाचा अलाहिदा, मोबदला मिळणार नाही.

५. गैरहजर/ अनुपस्थित कालावधीचा मेहनताना कपात करण्यात येईल. गैरहजर राहणार याची आगाऊ सूचना देणे बंधनकारक आहे. साप्ताहिक व इतर सार्वजनिक सुटया अनुज्ञेय राहतील.

६. दरपत्रक कृषिविद्यावेत्ता, प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र, भाटये, ता.जि. रत्नागिरी यांचे नावे असणे आवश्यक आहे. **तसेच त्यावर ''एकत्रित वेतनावर कंत्राटी पद्धतीने पदे भरणे बाबत'' असे लिहीणे आवश्यक आहे.**

**७. संबंधित कामाचा अनुभव व कुशलता असणे आवश्यक त्यांना प्रथम प्राधान्य दिले जाईल.**

८. दरपत्रकासोबत सर्व आवश्यक शैक्षणिक कागदपत्रांच्या छायांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे. तसेच दरपत्रकामध्ये एका कामगाराचे **प्रति महिन्याचे एकत्रित वेतनाचा दर नमुद करणे आवश्यक आहे.**

९. सदरचा तात्पुरता कंत्राटी पद्धतीची नेमणूक ही कामाचा उरक, अचूकता इत्यादी बाबी समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहील असा अहवाल आक्षेपार्ह असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता सदर ठेका रद्द करण्यांत येईल.

१०.वरील कंत्राटी सेवा करण्या—या उमेदवाराला डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत कायम स्वरूपी नोकरी मिळण्यासाठी या कंत्राटाच्या सेवेचा हक्क प्राप्त होणार नाही. कंत्राटी पद्धतीने नेमलेल्या मनुष्यबळांची सेवा जेष्ठता नोंदी ठेवण्यात येणार नसून त्यांच्या कायम सेवेबाबतची कोणतीही बांधिलकी विद्यापीठ प्रशासनावर अथवा शासनावर राहणार नाही. तसेच सर्वोच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या याचिका क्र. एसएलपी—५४५३/९० निर्णयाच्या अनुषंगाने या ठेका कालावधीनंतर विद्यापीठ सेवेत कायम स्वरूपी नोकरी मिळणेबाबत हक्क राहणार नाही.

११. कोणतेही प्राप्त दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे बाबतचे त्याचप्रमाणे कोणतेही कारण न देता सदरील प्रक्रिया रद्द करणे बाबतचे अधिकार निम्नस्वाक्षरीकारांनी राखून ठेवले आहेत.

१२. दरपत्रके कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळेत सोबतच्या नमुन्यात टपालाद्वारे अथवा हात बटवडयाने प्राप्त होण्याची **अंतिम तारीख** २६/०९/२०१८ अशी असेल. **(दुपारी ४ वाजेपर्यंत)**

१३.सदरची नेमणूक निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात ६ महिने कालावधीपर्यंत करण्यांत येणार आहे.

१४.आदेश मिळाल्यापासून सात दिवसाच्या आंत त्यांना नेमणूकीच्या ठिकाणी प्रत्यक्ष कर्तव्यावर हजर व्हावे लागेल अन्यथा सदर नेमणुकीचे आदेश रद्द करण्यांत येतील.

१५.सदर तात्पुरती नेमणूक उमेदवाराचे पूर्व चारित्र्य व वर्तणुक तसेच नेमुन दिलेले काम यांच्या समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहिल. असा अहवाल आक्षेपार्ह असल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता उमेदवारास पदावरून कमी करण्यांत येईल.

१६.उमेदवाराला देण्यात आलेले काम सोडावयाचे असल्यास त्याने तशी आगाऊ सूचना देऊन राजिनामा मंजूर करून घ्यावा. जर तशी आगाऊ सूचना न दिल्यास संबंधितांकडून १ महिन्याचा मेहनताना वसुल करण्यांत येईल. तसेच अशा व्यक्तीचा ठेका भविष्यात विचारात घेता येणार नाही.

१७.कोणतेही कारण न दाखविता सेवा समाप्त करण्याचे पूर्ण अधिकार कार्यालयाला असतील.

१८.निवड झालेल्या उमेदवाराल दरपत्रक तसेच तात्पुरत्या स्वरूपातील नेमणूकीच्या आदेशामधील अटी व शर्ती मान्य असल्या बाबतचे हमीपत्र रक्कम रू. १००/— मात्रच्या बंधपत्रावर लिहूण देणे बंधनकाराक आहे.

**कृषिविद्यावेत्ता,**
**प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र,**
**भाटये, ता.जि. रत्नागिरी.**

सोबत—विहीत नमुना

जा.क्र./प्रानासंके,1239/ /2018
प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र, भाटये
दिनाक 12 SEP 2018

प्रत: प्रसिद्धीसाठी रवाना

१) प्रा.ना.सं.केद्र, भाटये (कार्यालय नोटीस बोर्ड)
२) ग्रामपंचायत कार्यालय, भाटये, रत्नागिरी.
३) ग्रामपंचायत कार्यालय, फणसोप, रत्नागिरी.
४) ग्रामपंचायत कार्यालय, शिरगाव, रत्नागिरी.
५) मा. संचालक विस्तार शिक्षण, डॉ.बा.सा.को.कृ.वि.,दापोली यांना विनंती करण्यात येते की वरील निविदा विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करून मिळावी.
६) मा. प्रमुख कृषि ज्ञान माहिती केंद्र, akmudbkkv@gmail.com सकेंत स्थळावर प्रसिध्द करण्यासाठी